MHKO190003992025

**निशाणी क्रमांक ५ खालील आदेश**

**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.१२/२०२५**

**आरती अमर पाटील वि. अमर मारुती पाटील व इतर**

**(दिनांकः१६/०३/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी व संरक्षण आदेश मिळणेकरीता सादर केला आहे.

**अर्जदार हिची अर्जातील थोडक्यात कथनेः-**

२. अर्जदार व वि.प.नं.१ यांचा दिनांक ०३/०६/२००५ इ. रोजी हिंदू धर्म शास्त्रानुसार व रितीरीवाजानुसार झालेला होता व आहे. सदर वैवाहीक संबंधामधून अर्जदार व वि.प यांना अभय (वय वर्ष १८) नावाचा मुलगा झालेला आहे. वि.प.नं.२ ही अर्जदार हिची सासू आहे. लग्नानंतर सुरूवातीचे काही दिवस वि.प. यांनी अर्जदार हिला व्यवस्थित नांदवले. त्यानंतर वि.प. हे अर्जदार हिचेवर संशय घेवुन व अपशब्द वापरुन शारिरिक व मानसिक त्रास देवु लागले. अर्जदार ही संसार टिकविण्यासाठी व मुलगा अभय याच्या भवितव्याचा विचार करुन सन २०१५ पर्यंत वि.प यांचा सर्व त्रास सहन राहीली. वि.प यांच्या त्रासाचा अतिरेक झाल्यामुळे अर्जदार हिने दिनांक ०१.०६.२०१६ रोजी पोलिस निरीक्षक, पोलीस ठाणे राधानगरी येथे रितसर लेखी तक्रार दाखल केली होती. सन २०२३ च्या अधिक मास महिन्यामध्ये सुहास पाटील नावाच्या व्यक्तीने वि.प.नं.१ यास अर्जदार हिचे अंगावर भूत बसले असे असे सांगीतले व ते काढणेसाठी सुहास पाटील हा साताप्पा कांबळे या व्यक्तीला घेवुन आला होता. त्यावेळी विधीच्या नावाखाली सदर इसमांनी अर्जदार हिचेशी गैरवर्तन करुन चुकीच्या पध्दतीने तिच्या

शरिराला स्पर्श केला. त्याबाबत अर्जदार हिने वि.प.नं.१ यास सांगीतले असता त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. वि.प.नं.१ हा अर्जदार हिच्या पिण्याच्या पाण्यामध्ये राख व भंडारा टाकत असे. तसेच अर्जदार हिला धमकी देत असे. अशाप्रकारे वि.प याने अर्जदार हिचा शारिरिक व मानसिक छाळ केलेला आहे. वि.प याच्या सदरच्या कृत्यामुळे अर्जदार हिला तिच्या माहेरी राहणे भाग पडत आहे.

३. अर्जदारचे कथन पुढे असे की, वि.प याने मुलगा अभय व अर्जदार हिची कोणतीही विचारपूस केलेली नाही. तसेच त्यांच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही. वि.प.नं.१ हा एस.टी महामंडामध्ये नोकरीस असून त्याला महिना रक्कम रु.५०,०००/- इतका पगार मिळतो. तसेच शेतीतील उत्पन्नातून देखील वार्षिक रक्कम रु.४,००,०००/- इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिचा पत्नी म्हणुन सांभाळ करणेची वि.प ची जबाबदारी आहे. अर्जदार ही स्वतःचे व मुलगा अभय याचे पालनपोषण करणेस असमर्थ आहे. त्यामुळे अर्जदार हीला प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

४. अर्जदार ही ग्रा.प.मि.नं.३१३/१,२ या घर मिळकतीमध्ये राहात असून वि.प सदर घरामध्ये येवून तिचा शरिरिक व मानसिक छळ करत आहे. त्यामुळे वि.प यांनी सदर घर मिळकतीमध्ये येवुन तिला कोणताही त्रास देवू नये असा आदेश होवून वि.प यांच्या बेकायदेशीर कृत्यास प्रतिबंध होणे आवश्यक आहे. सबब, अर्जदार हिने संक्षण आदेश होवुन मिळावा अशी विनंती केली.

५. वि.प. यांनी नि.क्र.९ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले. वि.प यांनी त्यांचे म्हणणेमध्ये अर्जदार हिचेशी असलेले नातेसंबंध वगळता अर्जातील इतर सर्व कथने

नाकारली आहेत. वि.प यांचे कथन असे की, अर्जदार हिला वि.प यांच्या एकत्र कुटूंबासोबत राहणे आवडत नसलेने ती वि.प कडे वारंवार तक्रार करत असे. अर्जदार ही सासरी नांदत असताना शुल्लक कारणावरून वि.प नं.१ च्या आईवडिलां सोबत भांडण करत असे. तसेच वि.प नं.१ च्या बहीणींना माहेरी येण्यास मज्ञाव करत असे. अर्जदार ही वि.प व त्याचे कुटूंबातील इतर व्यक्तीसोबत अत्यंत हिन दर्जाने वागुण त्यांना शिवीगाळ करणे, अपमाणकारक वागणुक देणे अशी कृती करत असे. अर्जदार हिच्या सदरच्या कृत्यामुळे वि.प.नं.१ यास आई वि.प.नं.२ पासून वेगळे राहावे लागले व आजही वि.प.नं.२ या विभक्त राहात आहेत.

६. वि.प यांचे कथन पुढे असे की, वि.प.नं.१ हा परिवहन महामंडळामध्ये वाहक या पदावर नोकरीस असून त्यास २४ तास सेवा करावी लागते. अशा वेळी अर्जदार ही वि.प यास कधीही जेवणाचा डबा तयार करुन देत नसे. त्यामुळे वि.प.नं.१ यास उपाशीपोटी राहावे लागत असे. वि.प.नं.१ याने अर्जदार हिचे नाव घरठाण पत्रकी लावलेनंतर अर्जदार ही वारंवार वि.प.नं.१ यास सदरचे घर माझे आहे तुम्ही माझ्या घरामध्ये राहायचे नाही असे बोलुन त्याच्याशी वाद घालत असे व त्यास घरी येणेस मज्ञाव करत असे. माहे सप्टेंबर,२०२२ पासून अर्जदार व वि.प.नं.१ हे एकाच छताखाली विभक्त राहात असून अर्जदार हीने वि.प.नं.१ यास कधीही जेवण दिलेले नाही. वि.प.नं.१ याने अर्जदार व मुलगा अभय यांच्या पालणपोषणामध्ये कोणतीही कमतरता राहू नये म्हणुन त्याच्या ऐपती प्रमाणे जे काही करता येईल ते प्रामाणिकपणे केलेले आहे. सन २०२४ पासून अर्जदार हिने वि.प.नं.१ यास घरामध्ये राहण्यास मज्ञाव केल्याने त्याला भाड्याच्या घरामध्ये राहावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारने ग्रामपंचायत मिळकत नं.३१३/२ बाबत मागणी केलेल्या दादी मंजूर करता येणार नाहीत. वि.प.नं.१ याने घर खरेदीसाठी, मुलाच्या शैक्षणिक खर्चासाठी व इतर कौटूंबिक कारणासाठी बँकेतून कर्ज

घेतली असून त्यापोटी दरमहा रक्कम रु.३०,०००/- इतका कर्जाचा हप्ता भरावा लागत आहे. तसेच उर्वरीत पगारातून वि.प.नं.१ यास घरभाडे, मेसचा खर्च व वि.प.नं.२ च्या औषधोपचाराचा खर्च करावा लागत आहे. वि.प.नं.१ च्या बहीणींनी शेत मिळकती ताब्यात घेतल्या असुन त्यामधुन वि.प.नं.१ यास कोणतेही उत्पन्न मिळत नाही. अर्जदार हिच्या चुकीच्या व बेकायदेशीर वर्तणुकीमुळे वि.प यांना स्वतःचे घर सोडून भाड्याच्या घरामध्ये राहावे लागत आहे. अर्जदार हिने वि.प.नं.१ यास सांसारिक सुखापासून वंचीत ठेवल्यामुळे त्याचेकडून पोटगी मागणेचा कोणताही हक्क व अधिकार अर्जदारला प्राप्त होत नाही. शेवटी वि.प ने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

७. अर्ज व म्हणणे मधील कथनांचे अवलोकन केले असता माझ्यासमोर खालील विचाराधीन प्रश्न उत्पन्न झालेले आहेत. त्यावरील कारणमिमांसा निष्कर्षासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रथमदर्शनी हे सिध्द करते काय की, वि.प. याने तिचे विरुध्द कौटुंबिक हिंसाचार केला आहे? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्याकरीता पात्र आहे काय? आहे तर, किती ? | अंशतः होकारार्थी. (अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रु.७०००/- प्रमाणे) |
| ३. | अर्जदार ही संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| ४. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला. |

८. अर्जदार व वि.प तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

९. अर्जदार व वि.प. यांनी अनुक्रमे नि.क्र.१० व ११ कडे त्यांची मालमत्ता व जबाबदारीची शपथपत्रे दाखल केली आहेत. संरक्षण अधिकारी यांनी नि.क्र.१६ कडे कौटुंबिक घटना अहवाल सादर केला आहे.

१०. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्टयर्थ यादी नि.क्र.३/१ ते नि.क्र.३/३ सोबत पोलीस ठाणे राधानगरी येथे दाखल केलेल्या तक्रार अर्जाची झेरॉक्स प्रत, तसेच ग्रामपंचायत मालमत्ता क्र.३१३/१ व क्र.३१३/२ चे असेसमेंट उतारे अशी कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच अर्जदार हिने यादी नि.क्र.१३/१ ते नि.क्र.१३/७ सोबत वि.प च्या शेत मिळकतीबाबतचे ७/२ उतारे व त्यासंदर्भात झालेले आदेश दाखल केले आहेत. वि.प. याने यादी नि.क्र.१५/१ ते नि.क्र.१५/३ सोबत त्याचा बँक खाते उतारा, वि.प.नं.२ च्या वैद्यकिय खर्चाचे तपशिल इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

**विचाराधीन प्रश्न क्र.१ बाबत :-**

११. अर्ज व अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरुन अर्जदार व वि.प.नं.१ यांना त्यांचे वैवाहीक नाते संबंधाबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार ही सध्या वि.प.नं.१ पासून विभक्त राहात असल्याबाबत देखील दोन्ही पक्षकारांमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. सबब, अर्जदार ही वि.प.नं.१ याचेपासुन विभक्त राहात असल्याचे दिसुन येते. अर्जदार व वि.प यांनी एकमेकांवर केलेले आरोप हे अंतिम आदेशाचे वेळी शाबीत होणार आहेत. त्यामुळे त्याबाबत प्रस्तुत अंतरिम अर्जाच्या सुनावणीवेळी उहापोह करणे उचीत होणार नाही.

१२. अर्जदार हिच्या कथनांप्रमाणे ती सध्या वि.प.नं.१ पासून विभक्त राहत आहे. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच वि.प याने देखील तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिला तिच्या माहेरच्या लोकांवर विसंबुन राहुन जीवन व्यतीत करावे लागत आहे. वि.प याने त्याच्या कथनांमध्ये अर्जदार ही त्याच्यापासून विभक्त राहात असल्याचे कबुल केले आहे. वि.प याने अर्जदार हिचा पती या नात्याने तिच्या उदरनिर्वाहाची सोय केली असल्याचे त्याच्या कथनांमध्ये कोठेही कथन केलेले नाही.

१३. अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार ही वि.प पासून विभक्त राहात आहे. एक भारतीय विवाहीत महिला कोणतेही कारण नसताना तिच्या पतीचा त्याग करेल हे प्रथमदर्शनी विश्वसनीय दिसुन येत नाही. वि.प याने दाखल केलेल्या म्हणणेवरुन अर्जदार हिचे कथन अमान्य करण्यास पुरेसे कारण नाही. भारतीय संस्कृतीनुसार पतीने पत्नीच्या उदरनिर्वाहाची सोय करणे आवश्यक आहे. अर्जदार हिची पत्नी म्हणुन पालनपोषण करण्याची जबाबदारी वि.प. याची आहे. अर्जदार हिच्या अर्जातील व वि.प याच्या म्हणणेमधील कथनांवरुन हे स्पष्ट होते की, वि.प ने अर्जदार हिची कोणतीही जबाबदारी स्विकारलेली नाही अथवा तिच्या उदनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. तसेच प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यापासून देखील वि.प याने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिला इतरांवर विसंबुन राहून आपले जीवन व्यतीत करावे लागत आहे. वि.प याची सदरची कृती ही कौटूंबिक हिंसाचार म्हणुन गृहीत धरली तर अनुचीत होणार नाही. तसेच वि.प याने अर्जदार हिचे विरुध्द कौटूंबिक हिंसाचार केला होता हे अर्जदारचे कथन नाकारण्यास कोणतेही कारण नाही. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.२ बाबतः–</u>**

१४. अर्जदार हिने असे कथन केले आहे की, वि.प हा परिवहन कार्यालयामध्ये नोकरीस असून त्यास दरमहा ५०,०००/– इतका पगार मिळतो. वि.प याने त्याच्या म्हणणेमध्ये तो परिवहन कार्यालयामध्ये नोकरीस असल्याचे मान्य केले आहे. परंतु वि.प याने त्याला महिना किती पगार मिळतोयाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दिलेला नाही. वास्तविक वि.प याने त्याच्या मालमत्ता व जबाबदारी शपथपत्रामध्ये तो महिना किती कमावतो याबाबत न्यायालयास कळविणे गरजेचे होते.

१५. वि.प.याने त्याचे म्हणणेमध्ये तसेच मालमत्ता व जबाबदारीचे शपथपत्रामध्ये त्याने स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेकडून रक्कम रुपये नऊ लाख इतके कर्ज घेतले असुन त्याच्या पतफेडीकरीता मासिक रु.३०,०००/– इतका हप्ता भरावा लागत असल्याचे कथन केले आहे. वि.प.नं.१ ने पुढे कथन केले आहे की, सदरचे कर्ज त्याला घर खरेदीसाठी, अन्य कौटूंबिक कारणासाठी व मुलाच्या शिक्षणासाठी घेतलेल्या कर्जाऊ व हातउसण्या रकमा भागविण्यासाठी काढावे लागले आहे. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ११/०६/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. वि.प.नं.१ ने अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, त्याने सदरचे कर्ज दिनांक ०२/०७/२०२५ म्हणजेच अर्ज दाखल केल्यानंतर काढलेले आहे. अर्ज दाखल केल्यापासून ते कर्ज काढे पर्यंत किंवा त्यापुर्वी त्याने कोणते घर, कोठे व किती रकमेला खरेदी केले आहे यासंदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा वि.प.नं.१ याने दिलेला नाही. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वि.प.नं.१ याने अर्जदार हिला पोटगीची रक्कम देणे लागु नये व हाती शिल्लक राहणारे उत्पन्न कमी दिसावे याकरीता दिनांक ०२/०७/२०२५ रोजी कर्ज घेतले आहे. तसेच वि.प.नं.१ हा त्याची जबाबदारी टाळू

इच्छीत असल्याचे दिसुन येते सदर कृतीतून दिसुन येते. वि.प याने तो सध्या भाड्याच्या घरामध्ये राहात असून त्याला घरभाडे, मेसचा खर्च व वि.प.नं.२ च्या औषधोपचाराचा खर्च करावा लागत आहे असे कथन केले आहे. सदर कथनांच्या पुष्टयर्थ वि.प.नं.१ याने वि.प.नं.२ च्या औषधाच्या बिलाच्या झेरॉक्स प्रति अभिलेखावर दाखल केल्या आहेत. असे असले तरी अर्जदार हिचा पती म्हणुन तिचे पालनपोषण करण्याची वि.प.नं.१ ची नैतीक व कायदेशीर जाबाबदारी आहे.

१६. अर्जदार व वि.प यांची परिस्थिती तसेच अभिलेखावरील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता वि.प ची अर्जदार हिला पती म्हणुन सांभाळण्याची जबाबदारी आहे. वर नमुद चर्चीले प्रमाणे वि.प हा अर्जदार हिचा सांभाळ करत नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यासंदर्भात आदेश पारीत करणे आवश्यक आहे. पोटगीची रक्कम ठरविताना ती अल्पहीन नसावी तसेच भोगविलासी जीवन व्यतीत करण्याइतपतही नसावी. अर्जदार व वि.प यांची कौटूंबिक, आर्थीक व सामाजीक परिस्थिती विचारात घेता, तसेच अर्जदार हिच्या दैनंदिन गरजांचा, राहणीमानाचा व आजच्या जीवनावश्यक वस्तुंच्या किमतींचा विचार करता अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.७०००/–(रुपये सात हजार फक्त) इतकी अंतरीम पोटगी मंजुर करणे न्यायोचीत होईल. सबब, मी विचाराधीन प्रश्न क्र.२ चे निष्कर्ष अशंतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र.३ बाबत:–</u>**

१७. अर्जदारने तिच्या अर्जामध्ये वि.प.नं.१ व २ हे तिला ग्रा.पं.मि.नं.३१३/१ व ३१३/२ मधुन बाहेर काढण्याची भाषा वापरत आहेत असे कथन केले आहे. वि.प.नं.१ याचे म्हणणे व अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता अर्जदार ही ग्रा.पं.मि.नं.३१३/१ व ३१३/२ मध्ये राहात असल्याचे निर्विवाद आहे. अर्जदारने

तिच्या अर्जात हे मान्य केले आहे की, वि.प.नं.१ याने गट नं.११३४ मधील घर मिळकत खरेदी केली आहे. तसेच अर्जदार हिने नि.क्र.३/२ व ३/३ कडे दाखल केलेल्या असेसमेंट उता–यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दोन्ही मिळकतींना अर्जदारचे नाव आहे. अर्जदारने तिच्या अर्जात कथन केले आहे की, ती वर नमुद मिळकतींमध्ये वि.प.नं.१ सोबत राहात होती व आहे. यावरुन प्रथम दर्शनी असे दिसून येते की, जरी गट नं.११३४ मधील वर नमुद घर मिळकत वि.प.नं.१ ने खरेदी केली असली तरी महसुल दप्तरी त्या मिळकतीला अर्जदार हिचे नाव नमुद आहे. वि.प.नं.१ ने त्याच्या म्हणणेमध्ये तो सन २०२४ पासून अर्जदार पासून विभक्त दुसरीकडे भाड्याच्या घरात राहात आहे असे कथन केले आहे.

१८. अर्जदारने अंतरिम पोटगी सोबत वि.प. यांचेकडून तिला ग्रा.मि.नं.३१३/१ व ३१३/२ मध्ये राहणेस त्रास न होणेसाठी व वि.प.नं.१ व २ यांना व त्यांच्या नातेवाईकांना सदर मिळकतीमध्ये येणेस प्रतिबंध करुन तिला संरक्षण मिळावे अशी देखील मागणी केली आहे. परंतू वर नमुद केले प्रामाणे ज्या गटामध्ये घर मिळकत आहे तो गट वि.प.नं.१ याने खरेदी केला असल्याचीबाब निर्विवाद आहे. वि.प.नं.१ याच्याकडे राहणेसाठी वर नमुद मिळकती शिवाय इतर कोणती मिळकत आहे हे दाखविण्यासाठी कोणताही पुरावा नाही. तसेच अर्जदारचेच कथन आहे की, ती वि.प.नं.१ याचे सोबत ग्रा.पं.मि.नं.३१३/१ व ३१३/२ मध्ये विभक्त राहात होती व आहे. अशा परिस्थितीमध्ये वि.प.नं.१ व २ यांना व त्यांच्या नातेवाईकांना वर नमुद मिळकतीमध्ये जाणेस प्रतिबंध करणे न्यायोचीत होणार नाही. परंतु अर्जातील कथने व दोन्ही पक्षकारांनी एकमेकांवर केलेले आरोप पाहता वि.प. यांनी अर्जदार हिला ग्रा.पं.मि.नं.३१३/१ व ३१३/२ मध्ये राहणेस कोणताही त्रास देवु नये असा संरक्षण आदेश देणे योग्य ठरेल.

**विचाराधीन प्रश्न क्र.४ बाबत:–**

१९. वर नमुद चर्चा व विचाराधीन प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष यांना अनुसरुन विचाराधीन प्रश्न क्र.४ करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. वि.प. यास असा आदेश देण्यात येतो की, त्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.७०००/–(रुपये सात हजार फक्त) इतकी अंतरीम पोटगी द्यावी.

३. वि.प नं.१ व २ यांनी अर्जदार हिला ग्रा.पं.मि.नं.३१३/१ व ३१३/२ मध्ये राहणेस कोणताही त्रास करु नये असा संरक्षण आदेश पारीत करणेत येतो.

४. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी, राधानगरी व पोलिस निरीक्षक, पोलीस ठाणे, राधानगरी यांना माहीती करीता पाठविण्यात यावी.

५. सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना विनामुल्य देणेत यावी.

RAJENDRA DHANAJI SHINDE
Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.03.17 11:02:03 +0530

**(आर.डि.शिंदे)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
राधानगरी.

ठिकाण : राधानगरी
दिनांक:१६/०३/२०२६